**मुंबई, दि. ४ ( प्रतिनिधी )** : मुंबईतील दहिसर येथे अग्निशमन दलाच्या भरतीमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार होत असल्याचे निदर्शनास आल्याने संतापलेल्या तरुणींनी घोषणा देत आंदोलन केले. यावेळी मोठा गोंधळ निर्माण झाल्याने पोलिसांनी २ हजार मुलींवर लाठीचार्ज केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

दहिसर परिसरात सुरु असलेल्या अग्निशमन दलाच्या भरतीवेळी मोठा गोंधळ पाहायला मिळाला. गोपीनाथ मुंडे शक्ती मैदानावर ही भरती प्रक्रिया सुरू आहे. यासाठी राज्यभरातून हजारो महिला उमेदवार भरतीसाठी आल्या आहेत. मात्र, भरतीमध्ये अपात्र ठरवलेल्या महिला उमेदवार संतापलेल्याने वातावरण शांत करण्यासाठी त्यांच्यावर पोलिसांनी सौम्य लाठीचार्ज केल्याचे समजते.

अग्निशमन दलाच्या भरतीसाठी महाराष्ट्रभरातून महिला उमेदवार आल्या आहेत. यावेळी भरतीसाठी १६२ सेट सेंटिमीटर उंचीची अट ठेवण्यात आली आहे. मात्र, त्यापेक्षा जास्त उंची असल्याचे सांगत अपात्र ठरलेल्या महिला उमेदवारांना आपला राग अनावर झाला आणि त्यांनी मैदानाच्या परिसरातच घोषणाबाजी करण्यास सुरुवात केली.

अग्निशमन दलाने घालून दिलेल्या उंचीच्या नियमापेक्षा अधिक उंची असूनही या तरुणींना डावलण्यात आल्याचे या तरुणींचे म्हणणे आहे. दरम्यान, शिवसेनेच्या उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडून या महिला उमेदवारांना पाठिंबा देण्यात आला असून ही भरती प्रक्रिया रद्द केली नाही तर रस्त्यावर उतरण्याचा इशारा देण्यात आला आहे.

भरती प्रक्रियेसाठी राज्यभरातून आलेल्या तरुणींनी या भरती प्रक्रियेवर आरोप केले आहेत. यात भ्रष्टाचार सुरू असल्याचा आरोपही तरुणींनी केला आहे.

गेले २ दिवस आम्ही इथे आलो आहोत. आम्ही शेतकऱ्यांच्या मुली आहोत. आम्हाला उंची असून डावलण्यात येत असल्याचा आरोप मुलींनी केला आहे. तसेच अशाप्रकारे आमच्यावर अन्याय होत असून ही भरती प्रक्रियाच रद्द करावी, अशी मागणी या तरुणींनी केली आहे.

# मुख्यमंत्री शिंदेंनी माझ्याविरोधात निवडणूक लढवावी; आदित्य ठाकरे

**मुंबई, दि. ४ ( प्रतिनिधी )** : ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर जोरदार टीका केली आहे. मी या असंवैधानिक मुख्यमंत्र्यांना माझ्या विरोधात विधानसभा निवडणूक लढवण्याचे आव्हान देत आहे. मी माझ्या आमदारकीचा राजीनामा देईल आणि त्यांनी त्यांच्या आमदारकीचा राजीनामा द्यावा, त्यांनी वरळीतून माझ्या विरोधात निवडणूक लढवावी, असे आव्हान आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिले आहे.

केंद्र शासनाचा अर्थसंकल्प नुकताच सादर करण्यात आला. यानंतर आज मुंबई पालिकेचा अर्थसंकल्प २०२३ प्रस्तुत करण्यात आला. याविषयी बोलताना उद्धव ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी मुंबई मनपाचा अर्थसंकल्पावर आमची नजर होती असे सांगत केंद्राच्या बजेट मध्ये मुंबई पुणे महाराष्ट्राला काही मिळाला नाही, असे निरीक्षण नोंदवत केंद्र सरकारवर टीका केली.

महापालिकेच्या बजेटमध्ये मुंबईकरणाकडून ज्या सूचना मागवल्या मी सूचना दिल्या होत्या की, नवीन योजना जाहीर करू नये. आमचा पहिला विजय झाला आहे यात कोणता बिग बजेट योजना नाही. नगरसेवक आणि महापौरांचा तो अधिकार आहे. आपला दवाखाना आमचा प्रोजेक्ट होता.

मुंबई महापालिकेचा ५० हजार कोटींचा बजेट आज सादर झाला. नवीन मोठा प्रोजेक्ट नाही पण नवीन खर्च नाही. हे वर्षा बंगल्यावर छापून कॉन्ट्रॅक्टरचे बजेट आहे. रस्त्यांचे बजेट २ हजार कोटींचे असते ते आता सात हजार कोटींचे केले, अशी टीका आदित्य ठाकरे यांनी केली. रस्त्यांच्या टेंडर वर महानगर पालिका कोणाला फसबत आहे यावर ब्लॅक पेपर निघावा. सौंदर्यीकरणावर साडेसातशे कोटी रुपये दिले. हे अधिकार आयुक्तांना आहेत का? असा प्रश्नही त्यांनी विचारला.

लोकप्रतिनिधींना न विचारता पैसे खर्च केले जात आहेत. स्काय वॉकवर ७५ कोटी रुपये खर्च केले जात आहे. पण स्कायवॉक खराब दिसतात. आयुक्तच खर्च प्रस्ताव देत आहे आणि मान्य करत आहे. मुंबईत लोकशाही राहिली आहे का नाही? आजचे आयुक्तांचे भाषण म्हणजे वर्षा बंगल्यावरून आले आहे. मुंबईच्या पैश्याची उधळपट्टी सुरू आहे. यातच उत्पन्न कमी झाल्याचे स्वतः आयुक्तांना सांगितले असल्याचे आदित्य ठाकरे पत्रपरिषदेत म्हणाले.

# 'मराठी साहित्यिकांकडून महात्मा गांधींच्या स्वातंत्र्यसंग्रामाची उपेक्षा अन् उपहास'; डॉ अभय बंगां

**मुंबई, दि. ४ ( प्रतिनिधी )** : मराठी साहित्यिकांनी गांधींच्या स्वातंत्र्य संग्रामाची उपेक्षा केली. उपहास केला आणि उग्र विरोध केला आणि तरीही साधले नाही तेव्हा कोणीतरी गांधीचा खूनच करून टाकला, असं परखड मत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभय बंग म्हणाले. ही मराठी साहित्यिकांची मोठी मर्यादा आहे. कदाचित बहुतांशी लेखक हे ब्राह्मण होते आणि टिळकपंथी होते, म्हणून गांधी आपलासा वाटला नाही, जातीयता मध्ये आली आणि असे घडले असे मत डॉ. अभय बंग म्हणाले. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील प्रकट मुलाखतीत अभय बंग यांनी गेल्या शंभर वर्षातील मराठी साहित्य आणि साहित्यिकांवर जोरदार टीका करत गांधीविरोधी साहित्यिकांनी अंतर्मुख होऊन विचार करायची गरज असल्याचे मत व्यक्त केले.

डॉ. अभय बंग म्हणाले की, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आहे आणि तो वर्ध्यात होतोय. त्यामुळे तुम्ही मला संधी दिलेली आहे. मी आज दोन अतिशय गंभीर विधान साहित्याच्या बाबतीत करू इच्छितो. पहिला म्हणजे महात्मा गांधी हा एक विलक्षण महानायक १९२० ते १९४७ च्या काळात होता. त्या काळात एक महाभारत (स्वातंत्र्य संग्राम) भारतात घडले. मराठी साहित्यिक आणि मराठी साहित्याने याबद्दल न्याय केला का? मला असे वाटते वैचारिक क्षेत्रात केला गेला. मात्र, ललित साहित्यात याबद्दल दुर्दैवाने वाळवंटच आढळते. काही तुरळक अपवाद सोडता येते. मात्र बहुतांश मराठी साहित्य आणि मराठी साहित्यिक हे स्वातंत्र्य युद्ध आणि गांधी विचार व गांधींसारख्या महानायकापासून अलिप्तच राहिले. का राहिले हा प्रश्नच आहे.. एवढे मोठे महाभारत इथे घडत होते. ज्या महाभारतात ब्रिटिश आणि भारतीय असे दोन पक्ष होते. त्यात लाखो लोक भाग घेत होते. महाभारतासारखेच अनेक योद्धेही होते, प्रत्येकाच्या आपापल्या मर्यादाही होत्या. यापेक्षा चांगला कॅनव्हास मराठी ललित लेखकांना मिळूच शकत नाही. फ्रेंच राज्यक्रांतीवर, रशियन क्रांतीवर तिथल्या लेखकांनी अप्रतिम लिखाण केले. मात्र मराठीमध्ये असे काहीही झाले नाही, असे डॉ. अभय बंग म्हणाले.

डॉ. अभय बंग म्हणाले की, मराठीत शिवाजी महाराज आणि मराठ्यांच्या इतिहासावर सुंदर लोकप्रिय कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. मात्र, हा जिवंत इतिहास जो गेल्या शतकामध्ये मराठी साहित्यिकांच्या अंगणात, दारात आणि घराघरात घडला.. त्यासंदर्भात बहुतांशी मराठी साहित्यिक केवळ दूरच राहिले नाहीत तर त्यांनी त्याची उपेक्षा केली, उपहास केला आणि उग्र विरोधही केला. आणि तरीही साधले नाही, तरी कोणीतरी गांधीचा खूनच करून टाकला. ही मराठी साहित्यिकांची मोठी मर्यादा आहे. या महाभारतातून एखादे महाकाव्य लिहावे, एखादी महाकादंबरी घडावी असे काहीही घडले नाही. उलट दुर्दैवाने मी नथूराम गोडसे बोलतोय असा कालकूट विषय निघाला.

डॉ. बंग म्हणाले की, मराठी साहित्यिक आणि मराठी साहित्यिकांनी अंतर्मुख होऊन शांतपणे विचार करायला पाहिजे की असे का घडले. आमचा संकुचित प्रांतवाद मध्ये आला की गांधी मराठी नव्हता, असे घडले की आमची जातीयता मध्ये आली. कदाचित बहुतांशी लेखक हे ब्राह्मण होते आणि टिळकपंथी होते, गांधी आम्हाला आपलासा वाटला नाही आणि असे घडले, डॉ. अभय बंग म्हणाले. डॉ. बंग म्हणाले की, जो स्वातंत्र्य संग्राम लोकांच्या जीवनात प्रकट झाला.. ज्याच्यातून काँग्रेस सारखा राजकीय पक्ष समोर आला आणि सत्तेत गेला. साहित्यामध्ये हे सर्व का येऊ शकले नाही. मला आजही वाटते की हा विषय मराठी साहित्यिकांसाठी एक मोठे आव्हान आहे.. हे महाभारत त्यांची वाट पाहत आहे, असे डॉ. अभय बंग म्हणाले.

# शैलेश टिळक नाराज

## कसबा पोटनिवडणुकीत नवा ट्विस्ट!

**पुणे, दि. ४ ( वार्ताहर )** : मुक्ता टिळक यांच्या निधनानंतर कुटुंबातील सदस्यालाच उमेदवारी मिळेल अशी आशा होती. आम्ही पक्षाकडे तिकीटाची मागणीही केली होती. पण तिकीट देण्यात आले नाही. का दिले नाही माहीत नाही? अशी भावूक प्रतिक्रिया व्यक्त करताना मुक्ता टिळक यांचे पती शैलेश टिळक यांचा कंठ दाटून आला होता. त्यांच्या डोळ्यात पाणीही आले होते. शैलेश टिळक नाराज असल्याने कसबा पोटनिवडणुकीत नवा ट्विस्ट निर्माण झाला आहे.

हेमंत रासने यांना कसब्यातून भाजपकडून उमेदवारी घोषित करण्यात आली आहे. त्यानंतर शैलेश टिळक यासंबंधी बोलताना म्हणाले की, पक्षाकडे उमेदवारी मागितली होती परंतु वेगळा निर्णय घेतला गेला. पक्षाच्या या निर्णयावर त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. ते पुढे म्हणाले की, पक्षाने घेतलेला निर्णय मान्य आहे परंतु मुक्ता टिळक यांच्या कामावर अन्याय झाला आहे. त्यामुळे मनात खंत आहे. कोणतीही पोटनिवडणूक जाहीर झाल्यानंतर साधारण एखाद्याच्या घरातील व्यक्तीचे निधन झाले असेल तर त्याच्या कुटुंबातील व्यक्तीला नैसर्गिकपणे उमेदवारी दिली जाते. मीही उमेदवारीची मागणी केली होती, असे शैलेश टिळक म्हणाले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत काल



चर्चा झाली. उमेदवारी देण्याबाबत अजून काही निर्णय झाला नसल्याचे त्यांनी सांगितले होते. दिल्लीतून निर्णय होईल असे त्यांनी सांगितले होते. आज उद्या निर्णय होईल असेही ते म्हणाले होते. तसेच ताई गेल्यानंतर घरी यायचे राहिले होते. त्यामुळेही फडणवीस काल घरी आले होते. काल त्यांनी कोणतेही संकेत दिले नव्हते, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. तसेच आम्ही पक्षासोबतच राहू, असेही त्यांनी स्पष्ट केले.

मुक्ता टिळक यांच्या निधनानंतर भाजपकडून टिळक कुटुंबाबाहेरील उमेदवार देण्यात आला आहे.

पान १ वरून...

## प्रदूषणमुक्त मुंबईसाठी महापालिकेचा ॲक्शन प्लान

होणारा त्रास कमी करण्यासाठी नियोजनाचे विकेंद्रीकरण करणे आणि नागरीकांमध्ये आरोग्य विषयक जागरुकता निर्माण करणे अशाप्रकारे मुंबई स्वच्छ हवा उपक्रम तीन व्यापक उद्दीष्टांसाठी कार्य केले जाईल, असे त्यांनी अर्थसंकल्पात नमुद केल्याचे सांगितले. हवा प्रदुषणात बांधकाम व निष्कासन कचऱ्याचा मोठा वाटा आहे. बांधकाम व निष्कासन कचऱ्याच्या प्रसाराचे प्रमाण ठरवणे आव्हानात्मक आहे. दररोज निर्माण होणाऱ्या या कचऱ्याचा योग्य अंदाज लावणे, बांधकाम प्रकल्पांचा मागोवा घेणे, कचरा तथा डेब्रीज वाहून नेणारी वाहने झाकणे आणि पुनर्वापराकरीता नेल्या जाणाऱ्या कचरा तथा डेब्रीजवर योग्य ती देखरेख ठेवण्याच्या दृष्टीकोनातून मुंबई महापालिकेच्या माध्यमातून उपाययोजना अवलंबण्यात आली आहे. मुंबईत सुमारे ३५०० बांधकाम प्रकल्पांची कामे सुरु असून बांधकामाच्या ठिकाणी ही काळजी घेताना हे प्रकल्प सुरु होण्यापूर्वी जुने इमारत पाडकाम केले जाते. त्यातूनही मोठ्या प्रमाणात धुळीचे प्रदुषण वाढते. त्यामुळे बांधकामाच्या ठिकाणी धूळ कमी करण्यासाठी बांधकाम व्यावसायिकांकरीता मार्गदर्शक तत्वांची उपाययोजना प्रकल्पाच्या ठिकाणी अवलंबण्यासाठी मार्गदर्शक धोरण तयार करण्यात आले आहे.

## बेस्ट ला मदत

राज्य सरकारच्या निर्णयसापेक्ष ही रक्कम कर्ज स्वरूपात देण्यात आली आहे. बेस्टला पालिकेकडून गेल्या काही वर्षांमध्ये ७०० कोटी रूपयांची आर्थिक तरतूद करण्यात येत होती. यंदाच्या वर्षी मात्र या रकमेमध्ये १०० कोटींची भर पडली आहे. बेस्टचा सध्याच्या बसेसचा ताफा पाहता वर्षअखेरीस हा ताफा ३ हजार ७०० कोटींवर पोहचवण्यात यचेईल. तर मार्च २०२४ साठीचे ७ हजार बसेसच्या ताफ्याचे उदिष्ट ठेवण्यात आले आहे. या इलेक्ट्रिक बसेस असल्याने मुंबईतील प्रदुषण मुक्तीसाठी मदतच होईल, असा विश्वास पालिका आयुक्त आणि प्रशासक डॉ. इकबाल सिंग चहल यांनी व्यक्त केला.

## एबी फॉर्म चुकीचे दिल्याचा सत्यजित तांबेंचा गौप्यस्फोट

माझे वडीलांनी अनेकदा मला इच्छा नाही, माझा मुलगा निवडणूक लढणार असल्याचे श्रेष्ठींना स्पष्ट सांगितले होते. एबी फॉर्म वर दुसरे नावाच्या ठिकाणी चक्क निल असे म्हटलेले होते. तरीही मी काँग्रेसचा उमेदवार म्हणूनच फॉर्म भरला. परंतू एबी फॉर्म नसल्याने माझा अर्ज अपक्ष म्हणून निवडणूक अधिकाऱ्यांनी ग्राह्य धरला. ही बाब मीडियासह कोणीही निदर्शनास आणली नाही किंवा याची कोणीही दखल घेतली नसल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# पुण्यातील कसबा आणि चिंचवड पोटनिवडणुकीसाठी भाजपचे उमेदवार जाहीर

## कसब्यातून हेमंत रासने तर चिंचवडमध्ये अश्विनी जगताप निवडणूक लढणार

**पुणे, दि. ४ ( वार्ताहर )** : पुण्यातील कसबा आणि चिंचवडमध्ये होऊ घातलेल्या पोटनिवडणुकीसाठी अखेर भाजपने उमेदवार जाहीर केले. यामध्ये हेमंत रासने यांना कसब्यातून तर चिंचवडमध्ये अश्विनी जगताप यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

आमदार मुक्ता टिळक यांच्या निधनामुळे कसबा विधानसभा मतदार संघात टिळक कुटुंबातील सदस्यालाच उमेदवारी मिळेल अशी चर्चा होती. मात्र भाजपने त्यांच्या जागी हेमंत रासने यांनी उमेदवारी दिली आहे.

या निवडणुकीत भाजपने दिवंगत मुक्ता टिळक यांच्या कुटुंबाला डावलले अशी चर्चा होत असतानाच यावर पालकमंत्री आणि भाजपनेते चंद्रकांत पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

चंद्रकांत पाटील म्हणाले की, देवेंद्रजी आणि मी टिळक कुटुंबाला भेटून योग्य ते स्थान देण्यात येईल, अशाप्रकारे आश्वस्त केले आहे. त्यांनी देखील पक्षासोबत राहू असे म्हटले आहे.

तसेच जगताप यांच्या कुटुंबात कोणताही वाद नव्हता. लक्ष्मण जगताप यांच्या मुलाने समजदारी दाखवली. आमचं कुटुंब कोणीही तोडू शकणार नाही. ज्याला उमेदवारी मिळेल त्याच्या पाठिंशी संपूर्ण कुटूंब राहिल, असे त्यांच्या मुलाने सांगितल्याचे पाटील यांनी म्हटले.

टिळक कुटुंबाला डावलण्यात आले का, या प्रश्नावर पाटील म्हणाले की, टिळक कुटुंबाशी चर्चा करून ही निवडणूक जिंकणे किती महत्त्वाचे आहे,

हे पटवून दिले. त्यावर शैलेंद्र टिळक आणि कुणालला महाराष्ट्राचा प्रवक्ता म्हणून घोषित केले आहे. टिळक कुटुंबाच्या पाठिशी आम्ही आहोत, असेही पाटील यांनी म्हटले.


### जाहीर सूचना

सूचना याद्वारे माझे अशील श्रीम. मीना खालील शेख यांच्या वतीने देण्यात येते की, ते फ्लॅट धारक क्र. १०१, ए विंग, १ ला मजला, रश्मी रिजेन्सी १ बिल्डींग क्र. ए टू डी को-ऑप. हा. सो. लि., अदिती बँक्वेटसमोर, न्यु लिंक रोड, गाव आचोळे, नालासोपारा (पू), तालूका वसई, जिल्हा पालघर ४०१ २०९ येथील जमिन धारक पारदी क्र. ९,११,२४ व नवीन सर्व्हे क्र. १४, १८, १९, २०, २१, ५७, ५९, ६०, ६१, ६२, ६३, ६४, ६५, ६६, ६७, ६८, ६९, ७०, ११४, ११९, २४२, २५४, २५७, २५९, २६०, २६७, क्षेत्रफळ मोजमापित क्षेत्रफळ ४८९ चौ. फूट (चटई क्षेत्रफळ) धारक मालमत्तेचे मालक आहेत व पुन:विक्री करार नोंदणीकरण दस्तावेज क्र. वसई ३-०१२०७-२०१० अंतर्गत दि. २२.०१.२०१० रोजी करार केले होते. श्रीम. मीना खलील शेख यांनी सदर फ्लॅट मे. रष्मी हाऊसिंग प्रा. लि. यांच्याकडून खरेदी केला होता. सदर फ्लॅट मूळ शेअर प्रमाणपत्र धारक शेअर प्रमाणपत्र क्र. ००१, विभिन्न क्र. ००१ ते ०१०, शेअर प्रमाणपत्र स्टेशन पासून माझ्या घरापर्यंत प्रवास करताना गहाळ झाले. मी आचोळे पोलीस स्टेशन येथे गहाळ अहवाल क्र. २८६७-२०२३, दि. २५.०१.२०२३ रोजी तक्रार दाखल केली होती.

त्यामुळे मी याद्वारे सदर फ्लॅटच्या संबंधात कोणाही व्यक्तीस कोणतेही दावे वा आक्षेप असल्यास तसेच काही दावे असल्यास त्यांनी याद्वारे सदर प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ दिवसांच्या आत माझे वकील कार्यालय येथे लेखी स्वरूपात सदर पत्त्यावर वा वकील यांच्या कार्यालयामध्ये सूचित करणे आवश्यक आहे.

श्रीम. मीना खालील शेख
काऊन्टरसाईन

**श्री. अवनीश कुमार तिवारी**
**(वकील उच्च न्यायालय)**
**दुकान क्र. २१, जय विजय ग्रीन लिंक रोड, नालासोपारा (पू), तालूका वसई, जिल्हा पालघर.**

### जाहीर सुचना

सर्व जनतेस कळविण्यांत येते की, फ्लॅट क्र. बी / 106, पहिला मजला, "लोटस पॅलेस" को. ऑ. हा. सो. लि., बि. नं. सी-171, गांव- आचोळे, सर्वे नं. 243, एव्हरशाईन सिटी, वसई (पुर्व), ता. वसई, जि. पालघर-401208, हा फ्लॅट माझे अशिल सौ. ॲनी डिकोस्टा, यांचे मालकीचा आहे, परंतु सदर फ्लॅटबाबतचा मे. जय डेव्हलपर्स व श्री. पाध्ये बनमाली के., यांच्यामध्ये दि. 15/01/2000 रोजी निष्पादित झालेला विक्री करारनामा व तसेच सदरील फ्लॅटचे शेअर सर्टिफिकेट नं. 18 व डिस्टींगटिव्ह नं.86 ते 90 यांच्या मुळ प्रती त्यांचेकडून कुठेतरी गहाळ झालेल्या आहेत व म्हणून त्याबाबत त्यांनी आचोळे पोलिस ठाणे येथे दि. 04/02/2023, रोजी गहाळ अहवाल क्र 3914/2023, अंतर्गत गहाळ तक्रार नोंदविली आहे, तरी जर सदर करारनामा व शेअर सर्टिफिकेटची मुळ प्रत कोणाही इसमांस मिळाली असल्यास वा कोणीही इसम/बँक/संस्थेकडे गहाण/तारण असल्यास अथवा कुठल्याही प्रकारे हक्क, हितसंबंध वा अधिकार असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून 7 (सात) दिवसांच्या आत खाली दिलेल्या पत्त्यावर संपर्क साधावा, अन्यथा त्यानंतर सदरबाबत माझ्या अशिलांकडून कुठल्याही प्रकारचा हक्क वा दावा मान्य केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

सही /
ॲड. एस. के. चतुर्वेदी ॲन्ड असोशिएटस्
पत्ता- बी/ २०४, सिताराम भवन, आचोळे रोड, नालासोपारा (पु.),
जि. पालघर- ४०१२०९. मो. नं. 9320662121

### जाहीर सुचना

या सुचनेव्दारे कळविण्यांत येते की, माझे अशील श्रीमती बाईजाबाई अण्णा दौंडकर, यांचे पती श्री. अण्णा गेनू दौंडकर, हे फ्लॅट नं.008, "बी.एम.आर.डी.ए. एम्प्लॉईज "आकृती" को. ऑ.हा.सो.लि., गांव-आचोळे, सर्वे क्र. 134, प्लॉट नं. 13, आचोळे रोड, नालासोपारा (पुर्व), जि. पालघर-401 209, या फ्लॅटचे मालक होते. श्री. अण्णा गेनू दौंडकर यांचा दि. 24/04/2021 रोजी मृत्यु झाला व त्यांच्या मृत्युनंतर त्यांची पत्नी श्रीमती बाईजाबाई अण्णा दौंडकर, यांनी सादर केलेला अर्ज व इतर वारसांच्या संमत्तीपत्राच्या आधारे सदर फ्लॅटचा मालकी हक्क व शेअर्स सोसायटीकडून त्यांच्या नावे हस्तांतरीत करण्यांत आले आहेत व आज रोजी त्या सदर फ्लॅटच्या एकमेव मालक आहेत व त्याआधारे आज रोजी त्यांनी सदरील फ्लॅट इच्छुक खरेदीदार यांस विक्री करण्याचे ठरविले आहे तरी त्यासंदर्भात जर अन्य कोणीही वारस अथवा व्यक्तिचा कुठल्याही प्रकारे हितसंबंध वा हरकत असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून 7(सात) दिवसांच्या आत आपल्या हरकतींच्या पुष्ट्यार्थ खालील उल्लेखित पत्त्यावर संपर्क करावा, अन्यथा वरीलप्रमाणे कुठल्याही प्रकारची हरकत वा हितसंबंध नाही असे ग्राहय धरले जाईल व खरेदीदार यांचेबरोबर सदरील फ्लॅट विक्रीचा व्यवहार कायदेशीरपणे पूर्ण केला जाईल व त्यानंतर कुठल्याही प्रकारची हरकत वा दावा मान्य केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

सही /
ॲड. एस. के. चतुर्वेदी ॲन्ड असोशिएटस्
पत्ता- बी/ २०४, सिताराम भवन, आचोळे रोड, नालासोपारा (पु.),
जि. पालघर- ४०१२०९. मो. नं. 9320662121

### VJTF EDUSERVICES LIMITED

**CIN No. L80301MH1984PLC033922**
**Reg. Office:** Witty International School, Pawan Baug Road, Malad West, Mumbai - 400 064. **Tel.:** 022-61056800 / 01 / 02
**Fax:** 022- 61056803 **Email:** vjtfho@vjtf.com ,
**Website:** www.vjtf.com / www.wittykidsindia.com

**NOTICE OF BOARD MEETING**

NOTICE is hereby given, pursuant to Regulation 29 of the Listing Regulations, the meeting of Board of Directors of **VJTF EDUSERVICES LIMITED** will be held on Tuesday, 14 th February, 2023 at 5.00 P.M. at Witty International School, Pawan Baug Road, Malad West, Mumbai – 400064 the registered office of the Company, inter alia to transact the following business:

1. To consider and take on record the Unaudited Financial Results of the Company for the Quarter Ended on 31 st December, 2022, as per IND-AS pursuant to regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulation, 2015.
2. Any other matter with the permission of chair.

The notice of this meeting is also available on the website of the Company www.vjtf.com and website of the stock exchange ie. BSE Limited www.bseindia.co m.

**For VJTF EDUSERVICES LIMITED**
**Sd/-**
**Dr. Vinay Jain**
**Managing Director**
**DIN - 00235276**

**Date: 04/02/2022**
**Place: Mumbai**

### MUDRA FINANCIAL SERVICES LIMITED

**CIN : L65999MH1994PLC079222**
3rd Flr., Vaastu Darshan, "B" Wing, Above Central Bank of India, Azad Rd., Andheri (E), Mumbai - 400 069.
**Tel.** No. 022 - 61919293 **Email :** mudrafinancial.1994@gmail.com **website :** www.mudrafinancial.net

**Statement of Un-Audited Financial Results for the Quarter and Nine Months Ended 31st December, 2022** (Amount in Lakhs)

| Particulars | Quarter Ended | | | 9 Months Ended | | Year Ended |
|---|---|---|---|---|---|---|
| | 31-Dec-22 (Unaudited) | 30-Sep-22 (Unaudited) | 31-Dec-21 (Unaudited) | 31-Dec-22 (Unaudited) | 31-Dec-21 (Unaudited) | 31-Mar-22 (Audited) |
| Total Income from operations | 17.43 | 21.06 | 11.86 | 45.80 | 55.39 | 77.83 |
| Net Profit for the period (before tax, Exceptional and/or Extraordinary Items) | 5.89 | 9.65 | 3.59 | 14.60 | 31.04 | 43.53 |
| Net Profit for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary Items) | 5.89 | 9.65 | 3.59 | 14.60 | 31.04 | 43.53 |
| Net Profit for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary Items) | 3.46 | 7.37 | 1.78 | 9.09 | 23.99 | 30.66 |
| Total Comprehensive Income for the period [Comprising Profit for the period(after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 3.46 | 7.37 | 1.78 | 9.09 | 23.99 | 30.66 |
| Equity Share Capital | 501.00 | 501.00 | 501.00 | 501.00 | 501.00 | 501.00 |
| Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in Audited Balance Sheet of the previous year | - | - | - | - | - | 490.35 |
| Earnings Per Share (of Rs.10/- each) (for continuing and discontinuing operation) | | | | | | |
| 1. Basic: | 0.07 | 0.15 | 0.04 | 0.18 | 0.48 | 0.61 |
| 2. Diluted: | 0.07 | 0.15 | 0.04 | 0.18 | 0.48 | 0.61 |

**Notes:**
The above is an extract of the detailed format of Quarterly/Annual Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly/Annual Financial Results are available on the websites of the Stock Exchange(s) and the listed entity (https://www.mudrafinancial.in/).

For **Mudra Financial Services Limited**
Sd/-
**Dipen Maheshwari**
Managing Director
DIN: 03148904

**Place: Mumbai**
**Dated: 03rd February, 2023**

### जाहीर सुचना

जाहिर नोटीस प्रसिध्द करण्यांत येते की, माझे अशिल श्री.अनिल रामचंद्र देवलकर यांनी दुकान नं. ११, तळमजला, साई राज पार्क को. ऑप. हौ. सो. लि., सर्व नं. ६, हिस्सा नं. १ आणि ३ (जुना सर्वे नं. ६६ ), कांचनगाव, तालुका व जिल्हा कल्याण सदरहू मिळकत ही श्री. सुदय भार्गव जोशी व सौ. आशा भार्गव जोशी आणि श्री. उदय भार्गव जोशी यांच्याकडुन कायमस्वरूपी विक्री करारनाम्यानुसार विकत घेतली असून सदरहू करारनामा दुय्यम निबंधक कल्याण. ४ नोंदणीकृत दस्त कं. ८३२४/२०१२ नुसार कायमस्वरूपी विकत घेतलेली आहे.

वरनमुद मिळकत ही कै. भार्गव शामराव जोशी यांचे नावे असून सदरहू मिळकतीतील कै. भार्गव शामराव जोशी यांचे निधन दिनांक. ०८.०७.२०१० रोजी झालेले आहेत्यांच्या मुत्युपश्चांत श्री. सुदय भार्गव जोशी व सौ. आशा भार्गव जोशी आणि श्री. उदय भार्गव जोशी हे त्यांचे एकमेव कायदेशीर वारस आहेत. परंतु सदरहू वारसांनी योग्य तो वारसदाखला घेतलेला नाही. तरी कोणाला वरील वारस हे कै.भार्गव शामराव जोशी यांचे

कायदेशीर वारस नाहीत असे कळवण्यांचे झाल्यांस खालील पत्यांवर कळवण्यांत यावे

तसेच सबब वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये अन्य कोणाचेही हक्क, अधिकार, हिस्सा असल्यास अथवा किंवा हरकती असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेचे तारखेपासून ७ दिवासांचे आत लेखी किंवा तोंडी हरकत योग्य तो कागदोपत्री पुराव्यानीशी हजर करव्यात

ॲड. निलेश मो. पाटील
ऑफिस पत्ता. दुकान नं. ०६ , आगरी समाज बिल्डींग, दांडेकर क्लिनिकच्या शेजारी, लाईन आळी, जुने पनवेल४१०२०६.
फोन नं. ७७३८००९५०६.

### जाहीर नोटीस

येथे सूचना देण्यात येत आहे की, माझे अशील **श्री. आशीष मधुकर नागपुरे** हे फ्लॅट क्र. १०२, पहिला मजला, एच विंग, रीगल हाईट्स जी व एच विंग को-ऑप. हौ. सोसा. लि., सेक्टर ८, वसंत नगरी, वसई (पू) तालुका वसई व जिल्हा पालघर ४०१ २०८ या जागेचे मालक आहेत. ते वरील फ्लॅटच्या जागेवर तारण कर्ज घेत आहेत. **मे. सुविधा इंटरप्रयाझेस** यांनी सदर फ्लॅट **श्री. आशीष मधुकर नागपुरे व श्री. मधुकर बापूराव नागपुरे** यांना विक्री करार दि. १४.०२.२०१७ रोजी विक्री केला. श्री. मधुकर बापूराव नागपुरे यांचा मृत्यू दि. २१.०१.२०२२ रोजी मुंबई येथे झाला. मयत यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या मागे **१. रेखा मधुकर नागपुरे (पत्नी) २. ईशा लक्ष्मण पेडणेकर (मुलगी) ३. आशिष मधुकर नागपुरे (मुलगा)** हे केवळ कायदेशीर वारस आहेत. रिलीज करारानुसार **१. रेखा मधुकर नागपुरे २. ईशा लक्ष्मण पेडणेकर** यांनी त्यांचे शेअर, हक्क, अधिकार सदर फ्लॅटमधील **श्री. आशीष मधुकर नागपुरे** यांना रिलीज केले. त्यानंतर तो सदर फ्लॅटचा एकमेव मालक झाला. जर कोणाही व्यक्तीस सदर फ्लॅट तारण ठेवण्याबाबत आक्षेप असल्यास अथवा जर कोणाही व्यक्तीस वरील मालमत्तेमधील कायदेशीर वारस यांच्या संबंधात कोणतेही दावे, आक्षेप असल्यास तसेच विक्री, हस्तांतरण, वारसाहक्क, गहाण, भाडेकरार, हक्क, अधिकार आदी काही असल्यास त्यांनी त्यांचे दावे वा आक्षेप लेखी स्वरूपात दस्तावेज यांच्या पुरावे यांच्यासह अधोहस्ताक्षरित यांना सदर जाहिरात/ सूचनेच्या प्रसिद्धी तारखेपासून ७ दिवसांच्या आत सूचित करावे. ७ दिवसांनंतर कोणतेही दावे विचारात घेतले जाणार नाहीत व सदर फ्लॅट हक्क स्पष्ट व बाजारमूल्य आहेत असे गृहीत धरले जाईल व त्यानंतर माझा अशील वरील मालमत्ता संबंधित बँकेकडे गहाण ठेवण्यासाठी पुढे जाईल.

**आर. एल. मिश्रा**
**वकील उच्च न्यायालय, मुंबई**
दिनांक: ०५/०२/२०२३
कार्यालय क्र. २३, १ ला मजला, सन शाईन हाइट्स, रेल्वे स्टेशनजवळ, नालासोपारा (पूर्व), जि. पालघर - ४०१२०९

### इंडियन बैंक Indian Bank

इलाहाबाद ALLAHABAD

**चेंबूर शाखा : ७१-सी, सुंदर बिल्डींग, एन. जी. आचार्य मार्ग, चेंबूर, मुंबई ग्रेटर मुंबई ४०० ०७१.**
**दूर. (०२२) २५२१६५८१/२५२०५९९३ ईमेल : chembur@indianbank.co.in**

**परिशिष्ट - ४ (नियम ८(१)**
**ताबा सूचना (स्थावर मालमत्तेकरिता)**

ज्याअर्थी, अधोहस्ताक्षरीत इंडियन बँक यांच्या प्राधिकृत अधिकारी यांनी सीक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ व सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ व ९ सहवाचन अनुच्छेद १३ (१२) अंतर्गत प्राप्त अधिकारान्वये कर्जदार श्री. अमृत विजय परब व श्रीम. शामल विजय परब यांनी आमची चेंबूर शाखा यांच्यासह सदर मागणी सूचनेमध्ये निर्देशित एकत्रित रक्कमेचे प्रदान **रु. ३५,७९,१२८/- दि. ३१.०३.२०२१ अनुसार (रु. पसतीस लाख एकोणऐंशी हजार एकशे अठ्ठावीस मात्र)** सदर सूचनेच्या स्विकृती तारखेपासून ६० दिवसांच्या आत करण्याकरिता मागणी सूचना दि. १५.११.२०२२ रोजी जारी केली होती.

कर्जदार यांनी सदर रकमेचा भरणा करण्यास कसूर केली असल्याने, सदर सूचना कर्जदार व आम जनतेस देण्यात येत आहे की, अधोहस्ताक्षरित यांनी नियम ८ व ९ सहवाचन सदर ॲक्टच्या अनुच्छेद १३ (४) अंतर्गत सहवाचन त्यांना प्राप्त अधिकारान्वये खालील निर्देशित मालमत्तेचा दि. ०२ फेब्रुवारी, २०२३ रोजी ताबा घेतला आहे.

विशेषत: कर्जदार व आम जनतेस इशारा देण्यात येत आहे की, त्यांनी सदर मालमत्तेसंदर्भात व्यवहार करू नये व असे कोणतेही व्यवहार हे इंडियन बँक यांच्या प्रभारांतर्गत **रु. ३५,७९,१२८/- दि. ३१.०३.२०२१** अनुसार व त्यावरील व्याज व प्रासंगिक प्रभार मागणी सूचनेच्या तारखेपासून रकमेच्या अधीन असतील.

आम्ही सरफैसी कायद्याचे अनुच्छेद १३ (८) च्या तरतुदींअंतर्गत उपलब्ध कालावधीमध्ये प्रतिभूत मालमत्ता सोडवून घेण्यासाठी कर्जदारांचे लक्ष वेधून घेण्यात येत आहे.

**स्थावर मालमत्तेचे विवरण**

मालमत्ता धारक कार्यालय क्र. १३, तळ मजला, अनुराग बिझीनेस सेंटर, बोरला, सीटीएस क्र. ४१०, ४११, चेंबूर, मुंबई ४०० ०७१ चा सर्व तो भाग व भूखंड.

सीमा : उत्तरेस : वामन तुकाराम पाटिल मार्ग, दक्षिणेस : इंड. इस्टेट, पूर्वेस : सत्यभामा हॉटेल, पश्चिमेस : घाटला गाव.

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी,**
**इंडियन बँक.**

**दि. ०२.०२.२०२३**
**ठिकाण : मुंबई**